# भारतीय संविधान प्रथमच ब्रेल लिपीत प्रकाशित

## बार्टीच्या विशेष सहकार्यामुळे प्रकल्प पूर्णत्वास

**पुणे (प्रतिनिधी):** आम्ही भारताचे लोक अशी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची सुरुवात असणाऱ्या भारतीय संविधानातील लोकशाही प्रवण मुल्ये जतन आणि संवर्धित करणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. त्या अनुषंगाने आतापर्यंत सर्व प्रादेशिक भाषांमध्ये संविधानाचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. परंतु दृष्टिहीन बांधवांना वाचता येईल असे ब्रेल लिपीतून अद्यापपर्यंत संविधानाचे पुस्तक प्रकाशित करण्यात आलेले नव्हते. दृष्टीहीन बांधवांना ब्रेल लिपीतून वाचता व अभ्यासता यावे म्हणून मराठी भाषेतील भारतीय संविधान ब्रेल लिपीतून प्रथमच प्रकाशित करण्यात आले आहे.




स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवी मूल्यांच्या पायावर रचल्या गेलेल्या भारतीय संविधानाचे प्रथमच ब्रेल लिपित प्रकाशनाचा ऑनलाईन सोहळा पार पडला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यरत असणाऱ्या बार्टी म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था या महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त कार्यरत स्वायत्त संस्थेने या ऐतिहासिक प्रकल्पाला मूर्त स्वरूप देण्यासाठी आर्थिक सहकार्य करून मोलाचे योगदान दिले. बार्टीचे विद्यमान महासंचालक कैलास कणसे, भा. पो. से., यांनी सदर साहित्य प्रकाशित होण्याचे महत्व ओळखून सदर प्रस्ताव सादर करणाऱ्या बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाइंड, नासिक या संस्थेचे अध्यक्ष सतीश निकम यांना त्वरित मान्यता दिलीआणि बार्टीच्या प्रकाशन व प्रसिद्धी विभागाच्या प्रकल्प संचालक श्रीमती आरती डोळस यांनी प्रकल्प पूर्णत्वाला नेण्यासाठी पदोपदी मर्गदर्शन करुन संबंधित मुद्रक व प्रकाशक संस्थांशी समन्वय साधला.

भारतीय राज्यघटनेचे ब्रेल लिपीत लिप्यांतरण करण्याचे कार्य स्नेहांकित हेल्पलाइन फॉर व्हीज्युअली ईम्पेअर्ड, मुंबई या संस्थेने पार पाडले. भारतीय संविधानात अंतर्भूत असलेली ३९५ कलमे सहा भागांमध्ये लिप्यांतरीत करून त्यांनी ही जबाबदारी पार पाडली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर प्रकाशन सोहळ्याचे आयोजनातील मर्यादा विचारात घेऊन दिनांक १५ ऑगस्ट २०२० रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सदर ऐतिहासिक दस्ताचे ऑनलाईन प्रकाशनाचा सोहळा बार्टीच्या फेसबुक पेज व युट्युब चॅनल द्वारे पार पाडण्यात आला. यावेळी बार्टीचे महासंचालक कैलास कणसे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाइंड नासिक या प्रकाशक संस्थेचे अध्यक्ष सतिश निकम, सचिव, राजाराम गायकवाड उपाध्यक्ष, चिंतामण आहिरे, कार्यकारिणी सदस्य, दादा अल्हाट तसेच मुद्रक संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती परीमला भट, संचालक, डॉ. शंकर रमण, विश्वस्त, उत्कर्षा लाड, मुद्रक महेंद्र मोरे आणि सदर प्रकल्प पूर्णत्वाला नेण्यासाठी समन्वय साधणारे यादव गायकवाड, निबंधक बार्टी आणि प्रकाशन व प्रसिद्धी विभागाच्या प्रकल्प संचालक आरती डोळस यांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना कैलास कणसे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र साहित्य ब्रेल लिपीत आणण्यासाठी सदर प्रकाशन संस्थेला याहीपुढे बार्टी मार्फत सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असे आश्वासन दिले.

सदर महत्वपूर्ण उपक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली विभागाचे विभाग प्रमुख तथा ब्रेल अभ्यासक डॉक्टर महेश देवकर आणि संविधान तज्ञ डॉक्टर प्रताप सिंह साळुंखे यांनी शुभेच्छा दिल्या. ब्रेल लिपीतील सदर संविधानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या भागाचे विमोचन स्नेहांकित हेल्पलाइन फॉर व्हिज्युअली ईम्पेअर्ड या संस्थेचे मानद संचालक डॉ. शंकर रमण यांनी केले. तिसऱ्या आणि चौथ्या भागाचे प्रकाशन सदर संस्थेचे मुद्रक महेंद्र मोरे यांच्या हस्ते करण्यात आले आणि पाचव्या व सहाव्या भागाचे विमोचन सदर संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती परीमला भट यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी श्रीमती परीमला भट यांनी संविधानाच्या ब्रेल लिपीतील प्रास्ताविकेचे वाचन केले. सदर ऑनलाइन प्रकाशन सोहळ्यात बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाइंड नासिक या संस्थेचे अध्यक्ष सतीश निकम आणि सचिव सचिव राजाराम गायकवाड यांनीही ऑनलाइन उपस्थिती लावून आपले मनोगत व्यक्त केले.